# 'अर्बन बँके'च्या उर्वरित ठेवीदारांना ५० टक्के रक्कम पुढील महिन्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अवसायानातील नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या (बहुराज्यीय) उर्वरित ठेवीदारांना, पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना, ठेव पावतीच्या ५० टक्के रक्कम येत्या जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

बँक अवसायानात निघाल्याने शेकडो ठेवीदारांच्या सुमारे ३५० कोटींहून अधिक रकमेच्या ठेवी बँकेमध्ये अडकल्या आहेत. त्यापैकी ५ लाखांच्या आतील ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळाली आहे. पाच लाखांपेक्षा अधिक रकमेची ठेव असलेल्या गुंतवणूकदारांना पैसे परत मिळण्याची प्रतीक्षा होती. आता या ठेवीदारांना ५० टक्के रक्कम पुढील महिन्यात मिळणार आहे. याबाबत 'डीआयसीजीसी'कडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव बँकेने पूर्वीच सादर केला होता. त्यानुसार डीआयसीजीसी कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र नुकतेच बँक प्रशासनास प्राप्त झाले.

त्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी पूर्तता केलेल्या १ हजार ९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, दुसऱ्या टप्प्याचे 'आरबीआय'शी निगडित कामकाज जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या रकमा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिक
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती.
विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती
दुरध्वनी क्र. ०७२१–२६६१६१० e-mail: dgmamrava
ई–निविदा सूचना
ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील पारंपारिक व चिखलदरा तालुक्यातील विविध २२ गावातील घरांमध्ये एकुण ४००० नग व्हाईट एल. आस्थापित व कार्यान्वित करण्याकरीता सर्वेक्षण, पुरवठा, आस्थापना, चाचणी तसेच दुर:स्थ ५ वर्षाच्या हमी कालावधीत सेवा केंद्रासह व सुट्या भागांसह सर्वसमावेशक देखभाल व दुरुस (न.व न.ऊ. मंत्रालय) व बी.आय.एस. तसेच आवश्यक इतर शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणि उत्पादक / सिस्टीम ईन्टीग्रेटर्स (SI) यांच्याकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहे.
ई–निविदेच्या सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट
सर्व ई–निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाउ

श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को–ऑप.बँक लि